श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय:— माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (७ दिवस) भोजन तयार करावयाच्या मजुरीबाबत**

माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (७ दिवस) भोजन तयार करण्याच्या मजूरीबाबत सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती**

१) दरपत्रकात नमूद दिवसांकरीता भोजन बनविण्याच्या कामाचे दरपत्रक स्विकारल्यानंतर शनिवार दि. १० फेब्रुवारी २०२४ पासून ते शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीपर्यंत काम करणे आवश्यक आहे.
२) दरपत्रकामध्ये नमूद दिवसांकरीता मजूरीचे दर नमूद करणे आवश्यक आहे.
३) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.
४) प्रत्येक कंत्राटदाराने फक्त १ मोहोरबंद दरपत्रक सादर करावे. मोहोरबंद लिफाफ्यावर कामाच्या विषयाबाबतचा उल्लेख असावा.
५) कंत्राटदाराने सेवाकर क्रमांक दरपत्रकात नमूद करावा.
६) स्वयंपाकाकरीता लागणारा सर्व किराणा माल, भाजीपाला व गॅस न्यासातर्फे कंत्राटदारांना पुरविण्यात येईल.
७) भोजनाचा दर्जा उत्तम व चांगल्या प्रकारचा असावा. तसेच या व्यवसायात किमान पाच वर्षे काम केल्याचा अनुभव असावा. दरपत्रकात नमूद दिवसांप्रमाणे सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे भोजन (दरपत्रकातील नमूद संख्या व्यक्तींनुसार) तयार करणे आवश्यक राहिल.
८) अल्पोपहार व भोजन बनविण्याच्या संपूर्ण पूर्वतयारीसह स्वयंपाक वाढणे, ताटे—भांडी धुणे, चपात्या/पुरी करणे व इ. कामे करणे तसेच स्वयंपाकाकरीता लागणारी सर्व भांडी, गॅस शेगडया, टेबल—खुर्च्या (कव्हरसहीत), पर्याप्त मनुष्यबळ कंत्राटदारास आणावी लागतील, पुरविण्यात येणारे कामगार व्यवस्थित गणवेशात असणे आणि जेवण बनविताना स्वच्छतेबाबत विशेष काळजी बाळगणे आवश्यक राहिल
९) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.
१०) दरपत्रकधारकाने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे
    अ) आयकर नोंदणी पॅनकार्ड    ब) सेवाकर जी एस टी नोंदणी दाखला
११) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.
१२) दरपत्रके सिलबंद लखोटयात **मंगळवार, दि. ०६.०२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत** न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील नोंदणी शाखेत सादर करावीत.
१३) **मंगळवार, दि. ०६.०२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता** तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधींनी कृपया उपस्थित रहावे.
१४) कंत्राटदारास देयकाची रक्कम कंपनीच्या नावे आर.टी.जी.एस.द्वारे अदा करण्यात येईल.

Vpatil
**(वीणा पाटील)**
**कार्यकारी अधिकारी**

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

| दिनांक | वेळ | माघी महोत्सवातील जेवणाचे पदार्थ |
|---|---|---|
| शनिवार १० फेब्रुवारी २०२४ | सकाळचा चहा व अल्पोउपहार | पोहे, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, शेंगा आमटी, कुर्मा भाजी, बटाटा भाजी, पोळया, मिक्स भजी, चटणी, कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, दही, गुलाबजामुन |
| रविवार ११ फेब्रुवारी २०२४ | सकाळचा चहा व अल्पोउपहार | उपमा, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, अळुभाजी, छोले रस्सा, कोबी चनाडाळ, पोळया, कोथिंबीर वडी, चटणी, कोशिंबीर(मिक्स), लोणचे, पापड, ताक, दही, गाजर हलवा |
| सोमवार १२ फेब्रुवारी २०२४ | सकाळचा चहा व अल्पोउपहार | इडली, चटणी, सांबार,चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, पालक पातळभाजी, भेंडीफ्राय, मटकी उसळ, पोळया, कटलेट, चटणी, लोणचे, पापड, ताक, दही, बासुंदी |
| मंगळवार १३ फेब्रुवारी २०२४ श्री गणेश जयंती | सकाळचा चहा व अल्पोउपहार | साबुदाणा खिचडी, (बटाटावडा) नारळ चटणी, गोड दही, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, वटाणा मसाले भात, सुक्की बटाटा, डाळींबी उसळ, पुरी, मटार पॅटीस, गोड चटणी, कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, दही, उकडीचे मोदक/श्रीखंड |
| बुधवार १४ फेब्रुवारी २०२४ | सकाळचा चहा व अल्पोउपहार | बटाटा वडा/सबुदाणा वडा, नारळ चटणी/खजुर चटणी, गोड दही, चहा/कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, मसाले भात, सार, मटार पनीर, तोंडली रस्सा, पोळया, मटार अळुवडी, गोड चटणी, गाजर टॉमेटो कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, दही, पुरणपोळी |
| गुरूवार १५ फेब्रुवारी २०२४ | सकाळचा चहा व अल्पोउपहार | खमंग ढोकळा, पुदिना चटणी, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | पुलाव, शेंगा वरण/कैरी वरण, भरली वांगी, मुगाची उसळ, कोथींबीर वडी, पोळया, चटणी, कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, दही, शिरा, दुध, तुप |
| शुक्रवार १६ फेब्रुवारी २०२४ रथसप्तमी | सकाळचा चहा व अल्पोउपहार | बटाटा वडा, लाल ठेचा, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, जिरा राईस, डाल फ्राय, पालक मटार, चवळी बटाटा, कॉर्न पॅटीस, गोड चटणी, लोणचे, पापड, ताक, जिलेबी |

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## दरपत्रकाचा तपशील

**विषय:—माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत नाष्टा व भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याबाबत**

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

______________________________

पॅन कार्ड क्रमांक : ______________________________

जी एस टी क्रमांक : ______________________________

| अ. क्र. | | कामाचा तपशील | प्रति दिन व्यक्तींकरीता | एकत्र मजुरी दर रुपये एकूण ७ दिवसांकरीता (कर वगळून—सर्व समावेशक खर्चासह मूळ दर) |
|---|---|---|---|---|
| | **अ** | **दिनांक १०, ११, १२, १४ व १५ फेब्रुवारी, २०२४, या एकूण पाच दिवसांकरीता** | | रुपये................/— |
| | | अ) सकाळचा नाष्टा (बुफे) | ३०० | |
| | | ब) दुपारचे ब्रम्हवृंद भोजन पंगत | ३५ | |
| | | क) दुपारचे भोजन पंगत | ५०० | |
| | | ड) रात्रौ ब्रम्हवृंद भोजन पंगत | १५ | |
| | | इ) रात्रीचे भोजन पंगत | १०० | |
| | **ब** | **दिनांक १३ व १६ फेब्रुवारी, २०२४, या एकूण दोन दिवसांकरीता** | | |
| | | अ) सकाळचा नाष्टा (बुफे) | ३०० | |
| | | ब) दुपारचे ब्रम्हवृंद भोजन पंगत | ३५ | |
| | | क) दुपारचे भोजन पंगत | १५०० | |
| | | ड) रात्रौ ब्रम्हवृंद भोजन पंगत | १५ | |
| | | इ) रात्रीचे भोजन पंगत | १५० | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

विषयः— माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत नाष्टा व भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याबाबत.

## पदार्थांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | पदार्थांचा तपशील |
|---|---|
| १ | साधा भात, मसाले भात/पुलाव (दोन्ही प्रकार) |
| २ | दोन भाज्या (सुकी भाजी व रस्सा भाजी) |
| ३ | डाळ (साधे वरण व आमटी) |
| ४ | गोड पदार्थ (उकडीचे व तळलेले मोदक, पुरणपोळी, बासुंदी, हलवा, गुलाबजामुन श्रीखंड आणि इतर) |
| ५ | फरसाण पदार्थ (भजी/कोथिंबीर वडी/अलु वडी/कटलेट /बटाटा वडा/इतर) |
| ६ | चपाती/पुरी |
| ७ | कोशिंबीर, पापड, सलाड, लोणचे, दही, ताक/सोलकढी इतर |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का